Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**D**

# Paper-I

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ..............................................

2. (Signature) ........................................

(Name) ..............................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## AUG - 00115

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **60**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **sixty (60)** multiple-choice type of questions, out of which the candidate would be required to answer any *fifty* **(50)** questions. In the event of the candidate attempting more than fifty questions, the first fifty questions attempted by the candidate would be evaluated.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेत **साठ** बहुनिवड प्रश्न आहेत, यापैकी परीक्षार्थ्यांना कोणतेही **पन्नास** प्रश्न सोडवायचे आहेत. जर परीक्षार्थ्याने पन्नासपेक्षा जास्त प्रश्न सोडविले तर त्यावेळेस त्याने सोडविलेले पहिले पन्नास प्रश्नच तपासले जाईल.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Paper I
# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note** : (1) This Paper contains **Sixty (60)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks.

(2) Attempt any **Fifty (50)** questions.

**सूचना** : (1) या प्रश्नपत्रिकेत **साठ (60)** बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत.

(2) कोणत्याही **पन्नास** (50) प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. L, M, N, P and Q appeared for a test. M' scored better than P, but scored less than L and N. L scored better than N. P scored better than Q. Which of the following is the *correct* descending order based on their performance ?
(A) LNMPQ
(B) NLMPQ
(C) QPMNL
(D) PQMLN

2. Based on the following statements, which of the conclusion/s is/are *correct*?
**Statement I** : Some leaders are intelligent.
**Statement II** : All the managers are intelligent.
**Conclusion 1** : All the leaders are intelligent.
**Conclusion 2** : Some managers are intelligent.
(A) Only 1
(B) Only 2
(C) Both 1 and 2
(D) Both 1 and 2 do not follow

1. L, M, N, P आणि Q एका चाचणी परीक्षेला बसले. M ला P पेक्षा अधिक गुण मिळाले, परंतु L आणि N पेक्षा कमी गुण मिळाले.' L ला N पेक्षा अधिक गुण मिळाले. P ला Q पेक्षा चांगले गुण मिळाले. त्यांच्या गुणांचा विचार करता, खालीलपैकी कोणता पर्याय उतरता गुणानुक्रम दाखवितो ?
(A) LNMPQ
(B) NLMPQ
(C) QPMNL
(D) PQMLN

2. पुढील विधानांच्या आधारे, खालीलपैकी कोणते(ता) निष्कर्ष काढता येतील येतो ?
**विधान I** : काही नेते बुद्धिवान आहेत.
**विधान II** : सर्व व्यवस्थापक बुद्धिवान आहेत.
**निष्कर्ष 1** : सर्व नेते बुद्धिवान आहेत.
**निष्कर्ष 2** : काही व्यवस्थापक बुद्धिवान आहेत.
(A) फक्त 1
(B) फक्त 2
(C) 1 व 2 दोन्हीही
(D) 1 व 2 दोन्हीही नाही

3. Based on the following statements. Which of the conclusion/s will follow ?

**Statement I** : All tigers are brave.

**Statement II** : Some brave animals are kind.

**Conclusion 1** : Some tigers are kind.

**Conclusion 2** : Tom is a tiger, so he is brave.

(A) Only 1
(B) Only 2
(C) Both 1 and 2
(D) Neither 1 nor 2

4. Mohini, Nanda, Seema, Anisha and Sangeeta are participating in a race. At the end of the race, Seema was ahead of Nanda but behind Anisha. Mohini was behind of all. Sangeeta was ahead of Seema. Who must be the first three in order of finishing the race ?

(A) Mohini, Sangeeta, Seema
(B) Sangeeta, Seema, Anisha
(C) Anisha, Sangeeta, Seema
(D) Seema, Sangeeta, Anisha

3. पुढील विधानांच्या आधारे खालीलपैकी कोणते निष्कर्ष काढता येतील ?

**विधान I** : सर्व वाघ शूर आहेत.

**विधान II** : काही शूर प्राणी दयाळू आहेत.

**निष्कर्ष 1** : काही वाघ दयाळू आहेत.

**निष्कर्ष 2** : टाम वाघ आहे, म्हणून तो शूर आहे.

(A) फक्त 1
(B) फक्त 2
(C) 1 व 2 दोन्हीही
(D) 1 व 2 दोन्ही नाही

4. मोहिनी, नंदा, सीमा, अनिशा व संगीता एका धावण्याच्या स्पर्धेत भाग घेत आहेत. स्पर्धा संपण्याच्या वेळेस सीमा नंदाच्या पुढे परंतु अनिशाच्या मागे होती. मोहिनी सर्वांच्या मागे होती. संगीता सीमाच्या पुढे होती. स्पर्धा संपताना पहिल्या तिघी कोण असतील ?

(A) मोहिनी, संगीता, सीमा
(B) संगीता, सीमा, अनिशा
(C) अनिशा, संगीता, सीमा
(D) सीमा, संगीता, अनिशा

5. Which of the alternatives will complete the following letter series ?

HIG, LMK,............, TUS, XYW.

(A) PQO

(B) OPQ

(C) NOP

(D) MNL

6. Which of the following represents the *correct* relationship among Fruits, Mangoes, Alphanso ?

(A) 

(B) 

(C) 

(D) 

5. खालीलपैकी कोणता पर्याय दिलेली अक्षर श्रेणी पूर्ण करेल ?

HIG, LMK,............, TUS, XYW.

(A) PQO

(B) OPQ

(C) NOP

(D) MNL

6. खालीलपैकी कोणता पर्याय ‘फळे, आंबे, हापूस’ यामधील **योग्य** संबंध दाखवितो ?

(A) 

(B) 

(C) 

(D) 

**Use the following table to answer question Nos. 7 to 10 :**

The following table shows the distribution of candidates who appeared for MBA entrance examination and candidates who passed the examination in seven different institutes.

| Institutes | Distribution of Candidates | |
|---|---|---|
| | Appeared | Passed |
| A | 22% | 18% |
| B | 15% | 17% |
| C | 10% | 13% |
| D | 17% | 16% |
| E | 8% | 9% |
| F | 12% | 15% |
| G | 16% | 12% |
| Total No.of Candidates | 8550 | 5700 |

**प्रश्न क्र. 7 ते 10 साठी खालील तक्त्याचा उपयोग करावा :**

खालील तक्त्यामध्ये सात संस्थामध्ये MBA च्या प्रवेश परीक्षेमध्ये बसलेल्या आणि त्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थ्यांची माहिती दिली आहे ?

| संस्था | परीक्षार्थ्यांचे वितरण | |
|---|---|---|
| | परीक्षेला बसलेले | उत्तीर्ण झालेले |
| A | 22% | 18% |
| B | 15% | 17% |
| C | 10% | 13% |
| D | 17% | 16% |
| E | 8% | 9% |
| F | 12% | 15% |
| G | 16% | 12% |
| एकूण परीक्षार्थी | 8550 | 5700 |

7. What is the ratio of passed candidates to the candidates who appeared for the examination for institute A ?

(A) 9 : 11

(B) 14 : 17

(C) 6 : 11

(D) 9 : 17

8. What is the percentage of passed candidates among the candidates who appeared in institutes B and C together ?

(A) 68%

(B) 80%

(C) 74%

(D) 65%

9. Which institute has the highest percentage of candidates passed to the candidates appeared ?

(A) B

(B) C

(C) F

(D) E

7. A या संस्थेमधून परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींचे त्या संस्थेमध्ये परीक्षेला बसलेल्या परिक्षार्थींशी असलेले गुणोत्तर काय आहे ?

(A) 9 : 11

(B) 14 : 17

(C) 6 : 11

(D) 9 : 17

8. B आणि C या संस्थांमधून एकत्रितपणे परीक्षेला बसलेल्या परीक्षार्थींमधे तेथून उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची टक्केवारी काय आहे ?

(A) 68%

(B) 80%

(C) 74%

(D) 65%

9. परीक्षेला बसलेल्या परीक्षार्थींमध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची टक्केवारी कोणत्या संस्थेमध्ये सर्वाधिक आहे ?

(A) B

(B) C

(C) F

(D) E

10. The number of candidates passed from institutes A and D together exceeds the number of candidates appeared from institutes C and E together by :

(A) 228

(B) 279

(C) 399

(D) 407

**Use the following table to answer question No. 11 and 12 :**

Proportion of population of seven villages in 1997 :

| Village | % Population | % Population below Poverty Line |
|---|---|---|
| M | 16 | 38 |
| N | 15 | 52 |
| O | 11 | 42 |
| P | 16 | 51 |
| Q | 11 | 49 |
| R | 21 | 46 |
| S | 10 | 58 |

10. A आणि D या संस्थेमधून परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींची संख्या ही C आणि E या संस्थामध्ये परीक्षेला बसलेल्या परीक्षार्थींपेक्षा कितीने जास्त आहे ?

(A) 228

(B) 279

(C) 399

(D) 407

**प्रश्न क्र. 11 आणि 12 साठी खालील तक्त्याचा उपयोग करावा :**

सात गावांमधील 1997 मधील लोकसंख्येचे प्रमाण :

| गाव | लोकसंख्या % | दारिद्र्यरेषे खालील लोकसंख्या % |
|---|---|---|
| M | 16 | 38 |
| N | 15 | 52 |
| O | 11 | 42 |
| P | 16 | 51 |
| Q | 11 | 49 |
| R | 21 | 46 |
| S | 10 | 58 |

11. Find the population of village Q if the population of village M below poverty line in 1997 is 12160.
    (A) 18500
    (B) 20500
    (C) 22000
    (D) 26000

12. If the population of village P in 1997 is 32000, then what will be the population of village N below poverty line in that year ?
    (A) 14100
    (B) 15600
    (C) 16500
    (D) 17000

13. Which of the following is the *correct* chronology of communication technologies ?
    (A) Still Photography, Computer, Radio, Internet
    (B) Radio, Still Photography, Computer, Internet
    (C) Still Photography, Radio, Computer, Internet
    (D) Radio, Computer, Still Photography, Internet

11. M या गावात 1997 मध्ये दारिद्र्यरेषे खालील लोकसंख्या 12160 असेल, तर Q या गावाची एकूण लोकसंख्या किती ?
    (A) 18500
    (B) 20500
    (C) 22000
    (D) 26000

12. P या गावाची 1997 मधील लोकसंख्या 32000 असेल, तर त्यावर्षी N या गावातील दारिद्र्यरेषे खालील लोकसंख्या किती असेल ?
    (A) 14100
    (B) 15600
    (C) 16500
    (D) 17000

13. संज्ञापन तंत्रज्ञानांचा खालीलपैकी कोणता कालानुक्रम **योग्य** आहे ?
    (A) स्थिर छायाचित्रण, संगणक, रेडिओ, इंटरनेट
    (B) रेडिओ, स्थिर छायाचित्रण, संगणक, इंटरनेट
    (C) स्थिर छायाचित्रण, रेडिओ, संगणक, इंटरनेट
    (D) रेडिओ, संगणक, स्थिर छायाचित्रण, इंटरनेट

14. On the basis of structure and function identify the odd out from the following :
Facebook, G-mail, MySpace, Orkut, Linkedin :
(A) Linkedin
(B) G-mail
(C) MySpace
(D) Facebook

14. रचना आणि कार्य या निकषांवर खालील गटात न बसणारा घटक ओळखा :
फेसबुक, जी-मेल, मायस्पेस, ऑर्कुट, लिंक्डइन
(A) लिंक्डइन
(B) जी-मेल
(C) मायस्पेस
(D) फेसबुक

15. In the context of internet what is the full form of URL ?
(A) User Requested Link
(B) Ultimate Response Location
(C) Unique Request Locator
(D) Universal Resource Locator

15. इंटरनेटच्या संदर्भात URL या इंग्रजी लघुरूपाचे विस्ताररूप काय ?
(A) युझर रिक्वेस्टेड लिंक
(B) अल्टीमेट रिस्पॉन्स लोकेशन
(C) युनिक रिक्वेस्ट लोकेटर
(D) युनिव्हर्सल रिसोर्स लोकेटर

16. Which of the following softwares is used to process and analyse quantitative data ?
(A) Quark Express
(B) SPSS
(C) Quant Chrome
(D) SSQN

16. संख्यात्मक तथ्यांवर प्रक्रिया करण्यासाठी व विश्लेषण करण्यासाठी खालीलपैकी कोणते सॉफ्टवेअर वापरले जाते ?
(A) क्वार्क एक्सप्रेस
(B) एस.पी.एस.एस.
(C) क्वांट क्रोम
(D) एस.एस.क्यू.एन.

17. In the context of computer based word processing a typeset/fontset particularly used for Indian languages including Hindi and Marathi which can be easily used across different softwares and operating systems without the help of converter is called as :
    - (A) Unitype
    - (B) Indifont
    - (C) Unicode
    - (D) Ultiform

18. In the context of computing and internet, identify the *correct* pair from the following :
    - (A) TB—Memory Storage Unit
    - (B) Playstore—Operating system
    - (C) Pixel—Colour enhancing facility
    - (D) USB—Antivirus

19. Which one of the following is an example of *in situ* conservation of biological resources ?
    - (A) Botanical Garden
    - (B) Zoo
    - (C) Breeding Centers
    - (D) National Parks

17. संगणक आधारीत शब्द प्रक्रीयांच्या संदर्भात हिंदी व मराठीसह भारतीय भाषांसाठी विशेषत्त्वाने बनविलेल्या आणि कोणत्याही ऑपरेटिंग सिस्टीमवर तसेच सॉफ्टवेअरवर 'कन्व्हर्टर' सॉफ्टवेअरच्या मदतीशिवाय ही वापरता येऊ शकणाऱ्या फॉन्टसेटला काय म्हणतात ?
    - (A) युनिटाईप
    - (B) इंडीफॉन्ट
    - (C) युनिकोड
    - (D) अल्टीफॉर्म

18. संगणन व इंटरनेटच्या संदर्भात खालीलपैकी योग्य जोडी ओळखा :
    - (A) टीबी (TB) – माहिती साठवणूक एकक
    - (B) प्लेस्टोअर – ऑपरेटिंग सिस्टीम
    - (C) पिक्सेल – रंगवर्धक सुविधा
    - (D) यु.एस.बी. (USB) – अँटीव्हायरस

19. खालीलपैकी कोणते जीवशास्त्रीय संसाधनाच्या मूळस्थानी संवर्धनाचे उदाहरण आहे ?
    - (A) वनस्पती उद्यान
    - (B) प्राणी उद्यान
    - (C) प्रजनन केन्द्र
    - (D) राष्ट्रीय उद्यान

20. In which states is Western Ghat is spread and known for its rich biodiversity ?

    (A) Maharashtra–Rajasthan
    (B) Gujarat–Madhya Pradesh
    (C) Karnataka–Telangana
    (D) Maharashtra–Karnataka–Kerala

21. The solidwaste from hospital is classified as :

    (A) Hazardous
    (B) Non-hazardous
    (C) Compostable
    (D) Combustible

22. Which of the following pairs of air pollutant causes acid rain ?

    (A) Sulphur dioxide–Carbon dioxide
    (B) Oxides of nitrogen–Carbon monoxide
    (C) Sulphur dioxide–Oxides of nitrogen
    (D) Ammonia–Chlorine

20. जैव विविधतेच्या दृष्टीने अतीमहत्त्वाचे पश्चिम घाट कोणत्या राज्यामध्ये पसरलेले आहे ?

    (A) महाराष्ट्र—राजस्थान
    (B) गुजरात—मध्यप्रदेश
    (C) कर्नाटक—तेलंगना
    (D) महाराष्ट्र—कर्नाटक—केरळ

21. दवाखाण्यातील घनकचरा कोणत्या प्रकारात वर्गीकरण केला आहे ?

    (A) घातक
    (B) अघातक
    (C) सडलेले खत
    (D) पेट खेणारा

22. खालीलपैकी कोणत्या दूषित वायुच्या जोडी मुळे अम्ल पाऊस निर्माण होतो ?

    (A) सल्फर डायऑक्साईड्स — कार्बन डायऑक्साईड
    (B) ऑक्साईड्स ऑफ नायट्रोजन—कार्बन मोनॉक्साईड
    (C) सल्फर डायऑक्साईड—ऑक्साईड्स ऑफ नायट्रोजन
    (D) अमोनिया—क्लोरीन

23. Which of the following is a herbivorous animal ?
   (A) Snake
   (B) Frog
   (C) Deer
   (D) Fox

24. Large number of people have serious apprehensions about.............. energy.
   (A) Fossil fuel
   (B) Nuclear
   (C) Hydro-electricity
   (D) Solar

25. Which one of the following agencies regulates Higher Education ?
   (A) MHRD
   (B) NCTE
   (C) UGC
   (D) NCERT

26. Which one of the following is responsible for professional development of teacher's in the Higher Education ?
   (A) SCERT–SITE
   (B) NCERT–RIE
   (C) UGC–ASC
   (D) UGC–DEB

23. खालीलपैकी कोणता प्राणी शाकाहारी आहे ?
   (A) साप
   (B) बेडूक
   (C) हरीण
   (D) कोल्हा

24. खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या ऊर्जाच्या वापराविषयी अनेक लोकाच्या मनात मोठ्या प्रमाणात भीती आहे ?
   (A) कोळसापासून तयार केलेली ऊर्जा
   (B) अणु ऊर्जा
   (C) जलविद्युत
   (D) सौर ऊर्जा

25. खालीलपैकी कोणती संस्था उच्च शिक्षणाचे नियमन करते ?
   (A) एम.एच.आर.डी.
   (B) एन.सी.टी.ई.
   (C) यु.जी.सी.
   (D) एन.सी.ई.आर.टी.

26. उच्च शिक्षणातील शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाची जबाबदारी खालीलपैकी कोणाची आहे ?
   (A) एस.सी.ई.आर.टी.—एस.आय.टी.ई.
   (B) एन.सी.ई.आर.टी.—आर.आय.ई.
   (C) यु.जी.सी.—ए.एस.सी.
   (D) यु.जी.सी.—डी.ई.बी.

27. When was the first Open University established in the world ?
(A) 1969
(B) 1971
(C) 1980
(D) 1857

28. Which commission mentioned that "If we exclude spiritual training in our institution, we would be untrue to our whole historical development" ?
(A) Radhakrishnan Commission
(B) Kothari Commission
(C) Dave Commission
(D) Mudaliar Commission

29. "INFLIBNET" is :
(A) Research Portal
(B) Learning Resource Portal
(C) Educational Network
(D) Information Library Network

30. Which one of the following mission is related to Higher Education ?
(A) SSA
(B) RUSA
(C) RMSA
(D) EFA

27. जगातील प्रथम मुक्त विद्यापीठाची स्थापना केंव्हा झाली ?
(A) 1969
(B) 1971
(C) 1980
(D) 1857

28. ''जर आपण आपल्या संस्थांमधील आध्यात्मिक प्रशिक्षण वगळले तर आपण आपल्या ऐतिहासिक विकासाशी खोटे असू.'' असा कोणत्या आयोगाने उल्लेख केला आहे ?
(A) राधाकृष्णन आयोग
(B) कोठारी आयोग
(C) दवे आयोग
(D) मुदलियार आयोग

29. "INFLIBNET" हे :
(A) संशोधन पोर्टल आहे
(B) अध्ययन साधन पोर्टल आहे
(C) शैक्षणिक नेटवर्क आहे
(D) माहिती ग्रंथालय नेटवर्क आहे

30. खालीलपैकी कोणते अभियान उच्च शिक्षणाशी निगडीत आहे ?
(A) एस.एस.ए.
(B) आर.यू.एस.ए.
(C) आर.एम.एस.ए.
(D) इ.एफ.ए.

31. When choosing a teaching method, which of the following is considered to be the least important ?

(A) Nature of the content being taught

(B) Available resources

(C) Course objectives

(D) Students' likes and dislikes

32. The best feedback about mis-learning is obtained through :

(A) diagnostic testing

(B) summative evaluation

(C) objective-based testing

(D) qualitative evaluation

31. अध्यापनाची पद्धती निवडतांना खालीलपैकी कोणत्या गोष्टीचा विचार करण्याची गरज सर्वात कमी असते ?

(A) शिकविल्या जाणाऱ्या आशयाचे स्वरूप

(B) उपलब्ध साधन-सामग्री

(C) पाठ्यक्रमाची उद्दिष्टे

(D) विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी

32. चुकीच्या अध्ययनाबाबत सर्वोत्तम प्रत्याभरण ..........................द्वारे प्राप्त केले जाते.

(A) नैदानिक परीक्षण

(B) साकारिक मूल्यमापन

(C) उद्दिष्टाधारित परीक्षण

(D) गुणात्मक मूल्यमापन

33. The question, "Distinguish between animal cell and plant cell" is based on........................objective.
    (A) Comprehension
    (B) Analysis
    (C) Synthesis
    (D) Evaluation

34. Students who can effectively express their thoughts show.......................... intelligence.
    (A) Emotional
    (B) Linguistic
    (C) Inter-personal
    (D) Cognitive

35. The factors which most affect the quality of teaching are :
    (A) learner's abilities, teacher's communication skills, teaching method
    (B) teaching method, teacher's communication skills, teacher's training
    (C) teacher's salary, teacher's personality, teacher's training
    (D) classroom environment, use of audio-visual aids, learners' intelligence

33. ''प्राणी कोशिका व वनस्पती कोशिका यातील फरक स्पष्ट करा,'' हा प्रश्न..................... या उद्दिष्टावर आधारित आहे.
    (A) आकलन
    (B) विश्लेषण
    (C) संश्लेषण
    (D) मूल्यमापन

34. ज्या विद्यार्थ्यांना आपले विचार प्रभावीपणे व्यक्त करता येतात, ते..........................बुद्धिमत्ता दर्शवितात.
    (A) भावनिक
    (B) भाषिक
    (C) आंतर-वैयक्तिक
    (D) बोधात्मक

35. पुढीलपैकी कोणते घटक अध्यापनाच्या गुणवत्तेवर जास्तीत जास्त परिणाम करतात ?
    (A) अध्ययनकर्त्यांच्या क्षमता, शिक्षकाची संप्रेषण कौशल्ये, अध्यापनाची पद्धत
    (B) अध्यापनाची पद्धत, शिक्षकाची संप्रेषण कौशल्ये, शिक्षकाचे प्रशिक्षण
    (C) शिक्षकाचा पगार, शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, शिक्षकाचे प्रशिक्षण
    (D) वर्गवातावरण, दृक्-श्राव्य साधनांचा वापर, अध्ययनकर्त्यांची बुद्धिमत्ता

36. The most important purpose of home assignment is to :
    (A) keep students well engaged
    (B) instill habit of hard work in the students
    (C) provide feedback to the teacher regarding students' learning
    (D) help in better retention of content

37. Doing research involves these steps : (1) stating research objectives and hypothesis; (2) Methodology; (3) Identification of research problem; (4) Collection and analysis of data; (5) Statement of results and discussion.
    Identify their *correct* sequence :
    (A) 1→2→3→4→5
    (B) 4→1→3→2→5
    (C) 3→1→2→4→5
    (D) 2→1→5→3→4

38. The bibliography of a research report :
    (A) lists all the books published on the topic
    (B) lends credibility to the report and serves as a guide for further research
    (C) includes summaries of references listed in it
    (D) is always written in the format prescribed by the American Psychological Association

36. गृहपाठ देण्यामागील सर्वात महत्त्वाचा उद्देश ......................हा आहे.
    (A) विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे कार्यरत ठेवणे
    (B) विद्यार्थ्यांना कष्ट करण्याची सवय लावणे
    (C) शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबाबत प्रत्याभरण देणे
    (D) आशयाची चांगली धारणा होण्यास मदत करणे

37. संशोधन करताना (1) संशोधनाची उद्दिष्टे व अनुषंगिक गृहीतक; (2) पद्धतिशास्त्र; (3) संशोधन समस्या ओळखणे; (4) मिळालेल्या गुणात्मक/संख्यात्मक माहितीचे विश्लेषण करणे; (5) फलिताचे चर्चात्मक विवेचन करणे; या बाबींचा उपयोग केला जातो. त्यांचा योग्य क्रम लावा :
    (A) 1→2→3→4→5
    (B) 4→1→3→2→5
    (C) 3→1→2→4→5
    (D) 2→1→5→3→4

38. एखाद्या संशोधन अहवालाच्या संदर्भ :
    (A) सूचीमधे त्या विषयावर प्रकाशित सर्व पुस्तकांची यादी दिलेली असते
    (B) वाङ्मयामुळे त्या अहवालास विश्वासार्हता प्राप्त होते तसेच पुढील संशोधनासाठी मार्गदर्शन होते
    (C) सूचीत असलेल्या प्रत्येक संदर्भाचा सारांश दिलेला असतो
    (D) वाङ्मयाचे लिखाण फक्त अमेरिकन सायकॉलॉजिकल असोशिएशनने ठरविलेल्या पद्धतीनुसारच केले जाते

39. No hypothesis can be stated in........ terms.

    (A) directional

    (B) declarative

    (C) null and interrogative

    (D) general

40. The F-test :

    (A) is basically one-sided

    (B) is basically two-sided

    (C) can be either, depending on the hypothesis

    (D) can never be two-sided

41. Experimental research can be :

    (A) easily generalized

    (B) easily analyzed

    (C) easily planned

    (D) precisely controlled

42. The quality of a research journal is indicated by its............... .

    (A) *h*-index

    (B) *g*-index

    (C) i/o score

    (D) impact factor

39. कुठलेही गृहीतक.........................या प्रकारे मांडता येत नाही.

    (A) दिशादर्शक

    (B) उद्घोषणात्मक

    (C) शून्य आणि प्रश्नात्मक

    (D) सामान्य

40. F-चाचणी

    (A) मुख्यत: एक भुज असते

    (B) मुख्यत: द्विभुज असते

    (C) गृहीतकानुसार एकभुज किंवा द्विभुज असेल

    (D) द्विभुज कधीच नसते

41. प्रायोगिक संशोधनाचे.......................करता येते.

    (A) सहजपणे सामान्यीकरण

    (B) सहजपणे विश्लेषण

    (C) सहजपणे नियोजन

    (D) नेमकेपणाने नियंत्रण

42. एखाद्या संशोधन नियतकालिकाचा दर्जा........ याने दर्शविला जातो.

    (A) *h*-index

    (B) *g*-index

    (C) i/o score

    (D) impact factor

**Answer question Nos. 43 to 48 based on either the English passage or the Marathi passage :**

Parents have to develop the habit of thinking in terms of 'we', not 'me'. Think about the whole family. Some conventional, orthodox men feel they are the heads of the families. So it's their right to get all the advantages, privileges etc. Similarly some modern women think that 'Gone are the days. Now we are working and earning by shoulder to shoulder to men. Hence the women should get the equal or sometimes even more advantages and privileges'. Both such types of parents do not have 'we'-feeling. Family-oriented men and women would think of the whole family as a unit, the advantages as well as

**प्रश्न क्र. 43 ते 48 हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील किंवा मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :**

मराठीतील अल्पसत्ताक अभिरुचीला नवप्रवाहांनी आव्हान दिले आणि अभिरुचीची नवी जीवनक्षेत्रे व नव्या धारणा रुजविण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात केवळ भाषेचा विचार केला तरी पुरे. वस्तुतः मराठी ही बहुरंगी भाषा आहे. पण तिच्या समृद्धीची चाहूल एकोणीसशे साठपूर्वीच्या साहित्यातून क्वचितच लागते. ते बहुतांश साहित्य तुपात तळलेल्या शुद्ध मराठीत लिहिले गेले आहे. झाडाने मातीत रुजावे तसे माणसाचे व समाजाचे व्यक्तिमत्त्व निजभाषेतून रुजून येते. कोणतीही भाषा खऱ्या अर्थाने वापरणे म्हणजे ती बोलणाऱ्या समाजाच्या दृष्टीने जीवनाकडे पाहणे

troubles of each and every individual member in the family. Thus in any interpersonal relationship—between spouses, between parents and children, and between children—the thinking should be of 'win-win' type. The habit-formation should start from parents. Naturally the children will receive and absorb the same method of behaving.

When we listen with the intent to understand others, we begin true communication and relationship building. Generally parents go on ordering, dictating, coercing the child without listening to him/her. Hence there is no two-way communication between parents and children. One-way ordering and the other-way obeying or disobeying is generally observed in the society. Even in parent-child

असते. विविध जाती-समूहांची व परिसरांची मराठी संपन्न व बहुरंगी आहे. पण नागर मराठी साहित्यव्यवहारात ती नाकारली गेली होती. भालचंद्र नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे, ''ज्या समाजात मोठमोठ्या समूहांची, जातीजमातींची — पर्यायाने विविध समूहांची, जीवनाकडे पहाण्याची दृष्टी व पद्धत - एवढेच नव्हे, तर त्यांच्या सौंदर्यकल्पना आणि मूल्यही साहित्यव्यवहारातून बहिष्कृत केली जातात—त्या समाजात एक-प्रकारची अल्पसत्ताक वाङ्मयीन अभिरुची रूढ होते. तिला सुरुंग लावण्याचे काम दलित, ग्रामीण साहित्याने भाषेच्या अंगानेही केले. या लेखकांनी लिखित भाषा आणि बोली यांतील अंतर कमी केले. त्यामुळे आतापर्यंत मराठी साहित्याला अपरिचित असणाऱ्या अनुभवांच्या व्यक्ति-करणातील अडथळे कमी झाले. त्यांच्या अनुभवांना आपला असा सूर गवसला. बोलींच्या

relationship, it's better if parents first listen to children, observe their expressions, behaviour. Here they try to understand the child. Now it's likely that their reaction would be in line with the child's ability and expectation. In fact, parents have to remember that Success definitely deserves a hug, but Failure needs an even tighter embrace.

43. Some conventional men think that :

(A) they must take all the decisions in the family

(B) women should get equal advantages and privileges

(C) they must have all the conveniences and advantages in the family

(D) everyone in the family must obey them

वापरामुळे शब्दबंबाळपणा काहीसा कमी झाला. भावविवशतेला आळा बसला. वास्तवाचे चित्रण अधिक यथार्थाकडे झुकले. लोकजीवनाचे संदर्भ मिळून मराठी समृद्ध झाली. कोणत्याही थरातील माणसाला लिहिताना आत्मविश्वास वाटावा, असे भाषिक वातावरण तयार झाले. त्या वातावरणात अठरापगड जातीच्या माणसांनी नि:संकोच आत्मकथनाच्या वाटेने लेखनाचा ठसठशीत ओनामा जिरविला. ही अनगड देशीकार लेणी नवप्रवाहांनीच आपल्याला दिली आहेत.

43. व्यक्तिमत्त्वविकासाचे महत्त्वाचे साधन कोणते ?

(A) समाज

(B) जीवन

(C) स्वभाषा

(D) स्वधर्म

44. Thinking in terms of 'we' means thinking about :

(A) the family

(B) the nation

(C) both men and women

(D) the society

45. Which of the following statements is *true* ?

(A) Orthodox men have 'we'-feeling

(B) Children learn methods of behaviour from their parents

(C) Parents and children must have a friendly relationship

(D) The habit formation in the family should start from grand-parents

46. True communication and relationship building begin with :

(A) ordering and dictating

(B) ordering and obeying

(C) expecting and speaking

(D) listening and understanding

44. भाषेचा योग्य वापर म्हणजे ती भाषा बोलणाऱ्या समाजाच्या दृष्टीने जीवनाचे :

(A) आकलन

(B) रसग्रहण

(C) मूल्यमापन

(D) निरीक्षण

45. अल्पसत्ताक वाङ्मयीन अभिरुची का रूढ होते ?

(A) भाषेचे महत्त्व न कळाल्यामुळे

(B) जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोण नसल्यामुळे

(C) मराठी भाषा बहुरंगी असल्यामुळे

(D) साहित्यव्यवहार न कळाल्यामुळे

46. दलित, ग्रामीण लेखकांनी कोणते महत्त्वाचे काम केले ?

(A) त्यांनी बोलीचे महत्त्व स्पष्ट केले

(B) लिखित भाषेचे महत्त्व स्पष्ट केले

(C) भाषेचे महत्त्व नाकारले

(D) त्यांनी स्वभाषेला अभिव्यक्तीचे माध्यम बनवले

47. If parents try to understand the child, their reactions will be in consonance with the child's :

(A) behaviour

(B) achievements

(C) abilities

(D) ambitions

48. The most appropriate title for the passage is :

(A) The parent-child relationship and the family

(B) The compulsions of family life

(C) True relationship building

(D) Success and failure in the family

49. Which of the following is *not* an example of non-verbal communication ?

(A) Letter Writing

(B) Facial Expression

(C) Pace of Speaking

(D) Silence

47. बोलीच्या वापरामुळे शब्दांचा वापर कमी झाला असला, तरी त्यातील भावविवशता कमी झाल्याने लोकजीवनाच्या वास्तव चित्रणाला गती मिळाली.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

48. या उताऱ्यास अधिक समर्पक शीर्षक कोणते ?

(A) वाङ्मयीन प्रवाह

(B) भाषा आणि बोली

(C) दलित साहित्याचे महत्त्व

(D) ग्रामीण साहित्याचे महत्त्व

49. खालीलपैकी कोणते नि:शब्द संज्ञापनाचे उदाहरण **नाही** ?

(A) पत्रलेखन

(B) चेहऱ्यावरील हावभाव

(C) बोलण्याचा वेग

(D) मौन किंवा शांतता

50. On which criteria communication can be classified into 'Intra-personal', 'Inter-personal', 'group' and 'mass' communication ?

(A) Medium of communication

(B) Number of participants in communication

(C) Message of communication

(D) Purpose of communication

51. Which of the following is the most correct description of 'breaking news' in the context of news-channel ?

(A) A news mainly about a shocking or violent event

(B) A news mainly based on pictures taken by hidden camera

(C) A short and developing news about an important event just discovered

(D) A precise news focusing on investigation of political corruption

50. कोणत्या निकषाच्या आधारे संज्ञापनाचे 'स्व-संवाद' दोन व्यक्तींमधील संवाद, गटसंज्ञापन वा जनसंज्ञापन असे वर्गीकरण करता येते ?

(A) संज्ञापनाचे माध्यम

(B) संज्ञापनात सहभागी व्यक्तींची संख्या

(C) संज्ञापनातील संदेश वा आशय

(D) संज्ञापनाचा हेतू

51. वृत्तवाहिन्यांच्या संदर्भात 'ब्रेकींग न्यूज' या संज्ञेचे खालीलपैकी सर्वात योग्य वर्णन कोणते ?

(A) मुख्यत्त्वे धक्कादायक वा हिंसक घटनेशी संबंधित बातमी

(B) मुख्यत्त्वे छुप्या कॅमेऱ्याने टिपलेल्या घटनेशी संबंधित बातमी

(C) नुकत्याच कळलेल्या महत्त्वाच्या घटनेशी संबंधित छोटी आणि विकसनशील बातमी

(D) राजकीय भ्रष्टाचाराच्या शोध वा चौकशीवर आधारीत अचूक बातमी

52. What is the significance of the 1980s in the context of television in India ?
(A) Television transmission began in India
(B) DTH services for television began in India
(C) Rapid expansion of Doordarshan's network
(D) Privately owned TV channels were allowed in India

53. The round table sitting arrangement in a typical conference room facilitates :
(A) one-directional communication
(B) more interactive communication amongst participants
(C) top-down communication
(D) bottoms-up communication

54. What communicative dimensions are added when PowerPoint presentation is used in teaching ?
(A) Only visual
(B) Only Audio
(C) Audio as well as visual
(D) Audio, Visual and Interactive

52. भारतातील दूरचित्रवाणीच्या संदर्भात 1980च्या दशकाचे महत्त्व काय आहे ?
(A) भारतात दूरचित्रवाणी प्रक्षेपणाची सुरुवात
(B) भारतात दूरचित्रवाणी प्रक्षेपणासाठी डी.टी.एच. सेवेची सुरुवात
(C) दूरदर्शनच्या जाळ्याचा वेगाने विस्तार
(D) खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्यांना भारतात परवानगी

53. सर्वसाधारण परिषद कक्षामध्ये असलेली बसण्याची गोलमेज बैठक रचना कोणत्या प्रकारच्या संज्ञापनाला प्रोत्साहन देते ?
(A) एकेरी वा एकदिश संज्ञापन
(B) सहभागी व्यक्तींमधील आंतरक्रियात्मक संज्ञापन
(C) अधोगामी संज्ञापन
(D) उर्ध्वगामी संज्ञापन

54. शिकविताना पॉवरपॉईंट सादरीकरणाचा वापर केल्यामुळे संज्ञापनाले कोणते आयाम नव्याने मिळतात ?
(A) फक्त दृश्य
(B) फक्त श्राव्य
(C) श्राव्य आणि दृश्य
(D) श्राव्य, दृश्य आणि आंतरक्रियात्मक

55. Consider the following code words for the fruits

Banana $\rightarrow$ 010, Apple $\rightarrow$ 111, Mango $\rightarrow$ 101. By the nearest decoding procedure the codeword 000 will be decoded to :

(A) Banana

(B) Apple

(C) Mango

(D) Either Apple or Mango

56. Which of the following is *true* for the real numbers $\pi$ and $\sqrt{2}$ ?

(A) $\pi$ and $\sqrt{2}$ both are rational numbers

(B) $\pi + \sqrt{2}$ is a rational number

(C) $\sqrt{2}\pi$ and $\frac{\pi}{\sqrt{2}}$ are not real numbers

(D) $\pi^n$ is irrational for every natural number $n$

55. खालील प्रमाणे फळांचे नामकरण सांकेतिक शब्दांमध्ये केले

केळे $\rightarrow$ 010, सफरचंद $\rightarrow$ 111, आंबा $\rightarrow$ 101 तर जास्तीत जास्त जवळचा शब्द या नि:सांकेतिक नियमानुसार 000 या सांकेतिक शब्दाचे नि:सांकेतिकरण.............................होईल.

(A) केळे

(B) सफरचंद

(C) आंबा

(D) सफरचंद किंवा आंबा

56. खालीलपैकी कोणते विधान $\pi$ व $\sqrt{2}$ या वास्तव संख्यांच्या संदर्भात **सत्य** आहे ?

(A) $\pi$ व $\sqrt{2}$ या दोन्ही परिमेय संख्या आहेत

(B) $\pi + \sqrt{2}$ ही परिमेय संख्या आहे

(C) $\sqrt{2}\pi$ व $\frac{\pi}{\sqrt{2}}$ या वास्तव संख्या नाहीत

(D) $\pi^n$ ही प्रत्येक नैसर्गिक संख्या $n$ साठी अपरिमेय संख्या आहे

57. Suppose $x_1 = 10$, $x_2 = x_1 + \frac{1}{10}$, ....., $x_{k+1} = x_k + \frac{1}{10^k}$. Then which of the following is *not true* ?

(A) No two terms of the sequence are equal

(B) At least one term of the sequence is larger than 10.1112

(C) The sequence is strictly increasing

(D) Every term of the sequence is less than 11.11.

58. Assume that human beings will survive on the earth for infinity. Then :

(A) There is a person whose family line will never terminate

(B) Everyones family line may get terminated

(C) At least 50% of the present person's family line will not be terminated

(D) At most 50% of the present person's family line will not be terminated

57. समजा $x_1 = 10$, $x_2 = x_1 + \frac{1}{10}$, ....., $x_{k+1} = x_k + \frac{1}{10^k}$, तर खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ?

(A) या संख्यामालेतील कोणत्याही दोन संख्या समान नाहीत

(B) या संख्यामालेतील एकतरी संख्या 10.1112 पेक्षा मोठी आहे

(C) ही संख्यामाला क्रमश: वाढत जाणारी आहे

(D) या संख्यामालेतील प्रत्येक संख्या 11.11 पेक्षा लहान आहे

58. या भूतलावर अनंत काळापर्यंत मानवजात जिवंत राहिल्यास :

(A) एकातरी व्यक्तीची वंशावळ अखंडीत राहील

(B) प्रत्येकाची वंशावळ खंडीत होऊ शकते

(C) कमीत कमी 50% व्यक्तींची वंशावळ अखंडीत राहील

(D) जास्तीत जास्त 50% व्यक्तींची वंशावळ अखंडीत राहील

59. Three boys $\{b_1, b_2, b_3\}$ and three girls $\{g_1, g_2, g_3\}$ are registered in a marriage bureau. Suppose each boy wishes to marry a girl of his choice. In which of the following situations will each boy get married to a girl of his choice.

(A) $b_1$ likes $g_1$, $b_2$ likes $\{g_1, g_2\}$ and $b_3$ likes $g_2$

(B) $b_1$ likes $\{g_1, g_3\}$, $b_2$ likes $g_3$ and $b_3$ likes $g_1$

(C) $b_1$ likes $g_2$, $b_2$ likes $\{g_1, g_2\}$ and $b_3$ likes $g_3$

(D) $b_1$ likes $g_1$, $b_2$ likes $\{g_2, g_3\}$ and $b_3$ likes $g_1$

60. Suppose that in an organization every teacher is a scientist; every scientist who is not a teacher is an engineer. Therefore :

(A) every engineer is a scientist

(B) every teacher is an engineer

(C) every scientist is either a teacher or an engineer

(D) no teacher is an engineer

59. एका विवाह-नोंदणी संस्थेत $\{b_1, b_2, b_3\}$ या तीन मुलांनी व $\{g_1, g_2, g_3\}$ या तीन मुलींनी नावे नोंदविली. समजा प्रत्येक मुलाला त्याच्या पसंतीच्या मुलीशीच लग्न करावयाचे आहे. तर खाली दिलेल्या कोणत्या परिस्थितीमध्ये प्रत्येक मुलाला आपल्या पसंतीच्या मुलीबरोबर लग्न करणे शक्य होईल ?

(A) $b_1$ ची पसंती $g_1$ ला, $b_2$ ची $\{g_1, g_2\}$ ला व $b_3$ ची $g_2$ ला आहे

(B) $b_1$ ची पसंती $\{g_1, g_3\}$ ला, $b_2$ ची $g_3$ ला व $b_3$ ची $g_1$ ला आहे

(C) $b_1$ ची पसंती $g_2$ ला, $b_2$ ची $\{g_1, g_2\}$ ला व $b_3$ ची $g_3$ ला आहे

(D) $b_1$ ची पसंती $g_1$ ला, $b_2$ ची $\{g_2, g_3\}$ ला व $b_3$ ची $g_1$ ला आहे

60. एका संस्थेमध्ये प्रत्येक शिक्षक हा वैज्ञानिक आहे; प्रत्येक वैज्ञानिक, जो शिक्षक नाही, तो अभियंता आहे. तर :

(A) प्रत्येक अभियंता हा वैज्ञानिक आहे

(B) प्रत्येक शिक्षक हा अभियंता आहे

(C) प्रत्येक वैज्ञानिक हा शिक्षक आहे किंवा अभियंता आहे

(D) कोणताही शिक्षक हा अभियंता नाही

**ROUGH WORK**

**ROUGH WORK**

**ROUGH WORK**

**ROUGH WORK**